Estd. 1962
N.A.A.C.- A Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय :-** Annual PBAS व CAS फॉर्म च्या सुधारीत नमुन्यांबाबत

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. 30 जून 2010 च्या युजीसी अधिसूचनेद्वारे विद्यापीठातील शिक्षकांना नविन शैक्षणिक अर्हता लागू केल्या होत्या. सदर अर्हतांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने क्रं F.1-2/2016(PS Amendment) दि.11जुलै 2016 च्या युजीसी अधिसूचनेद्वारे चौथी सुधारणा केली असुन सदर अधिसुचनेमध्ये शिक्षक यांना PBAS व CAS साठी नविन शैक्षणिक अर्हता दिलेल्या आहेत. सदर युजीसी अधिसूचना महाराष्ट्र शासनाने क्रं. संकीर्ण–2017/प्र.क्र. 33117 विशि–1 दि.4 मार्च. 2017 च्या शासन निर्णयाने लागू केली आहे.

सदर युजीसी अधिसूचने मधील तरतुदीनुसार PBAS Proforma for Promotion under CAS व Annual Self-assessment for the performance Based Appraisal System (PBAS) आवश्यक आहे. सदर PBAS व CAS चे नमुने (Proformas) तयार करण्यात आले होते त्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली होती व ते शैक्षणिक वर्ष सन 2017–18 पासून लागू करण्यात आल्याचे या विभागाच्या परिपत्रक क्रमांक एसयु/आस्थापना /पी.जी/4012 दि. 21/12/2017 द्वारे कळविण्यात आले होते .

आता विद्यापीठ अधिकार मंडळाने सदर नमुन्यांमध्ये सुधारणा केलेली आहे. तेव्हा सन 2017–18 व 2018–19 या वर्षाचे स्वयंमुल्यमापन अहवाल Annual Self-assessment for the performance Based Appraisal System (PBAS) सादर करताना या नमुन्यांमध्ये भरुनच कार्यालयास सादर करावेत. तसेच ज्या शिक्षकांचा पदोन्नतीचा दिनांक 1 जून 2017 किंवा त्यानंतर आहे व ज्यांना आपल्या पदोन्नतीच्या प्रस्तावावर सहाव्या वेतन आयोनानुसार कार्यवाही व्हावी असे वाटते. (सदर सवलत दि. 08/03/2019 च्या शासन निर्णया पासुन तीन वर्षापर्यंत म्हणजे दि.08/03/2022 पर्यंत आहे) त्यांनी सदर नमुन्यांमध्ये अर्ज भरुन कार्यालयास सादर करावेत.

परंतु ज्या शिक्षकांनी या पूर्वी विभागाच्या दि. 21/12/2017 च्या परिपत्रकानुसार सन 2017–18 व 2018–19 या वर्षाचे स्वयंमुल्यमापन अहवाल Annual Self-assessment for the performance Based Appraisal System (PBAS) व PBAS Proforma for Promotion under CAS सादर केले आहे त्यांना पुन:श्च अर्ज करण्याची आवश्यकता नाही. फक्त त्यांचे गुणांकन सदर सुधारित नमुन्यातील Chart व मार्गदर्शक तत्वां प्रमाणे करण्यात येईल. सदर PBAS व CAS चे नमुने विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेत स्थळावर Registrar - Circulars या ठिकाणी उपलब्ध आहेत. सदर नमुने (Proforma) डाऊनलोड करुन घेण्यात यावेत व त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

कुलसचिव

क्रं. एसयु/आस्थापना/पीजी/ 1109

दिनांक : 30 SEP 2019

प्रतः–

सर्व अधिविभागप्रमुख , संचालक,समन्वयक,
पदव्युत्तर अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

–सदरचे परिपत्रक सर्व संबधित शिक्षकांच्या निदर्शनास आणावे.